# विद्याव्रत कार्यक्रम - 2026-27

आज आमच्या व्हिजन इंग्लिश मिडीयम स्कूल, न-हे, पुणे. येथे इयत्ता दहावीच्या (सन २०२६-२७) विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक सत्राला सुरुवात insightकरण्यात आली. या विद्यार्थ्यांसाठी ‘विद्याव्रत’ हा प्रेरणादायी व संस्कारमूल्यांची जपणूक करणारा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी अत्यंत भक्तिभावाने रामरक्षा स्तोत्राचे पठण करून सभागृहात पवित्र व मंगलमय वातावरण निर्माण केले. पुढे मुख्याध्यापिका सौ वृषाली सहस्रबुद्धे, वर्गशिक्षक आणि काही विद्यार्थी यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी सामूहिक आश्रमगीत म्हटले.

मुख्याध्यापिका मॅडमांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना जीवनातील शिस्त, नैतिक मूल्ये आणि एक जबाबदार भारतीय नागरिक म्हणून वागण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच अभ्यासासोबतच नियमित व्यायाम, सूर्यनमस्कार यांचे महत्त्व स्पष्ट करून सर्वांगीण विकासाचा संदेश दिला.

यानंतर अर्चना टीचरांनी विद्यार्थ्यांकडून SWOT विश्लेषण करून घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या ताकदी, कमकुवत बाजू, संधी आणि आव्हाने यांचा आत्मपरीक्षणात्मक विचार करण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी ‘विद्याव्रत’ प्रतिज्ञा घेतली. सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी प्रत्येक विद्यार्थ्याला संस्कृतमधील बोधपर श्लोक असलेला आकर्षक बुकमार्क प्रदान करण्यात आला.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक व नैतिक विकासाला प्रेरणा देणारा ठरला.